(SJIF) Impact Factor-7.675 ISSN-2278-9308

B.Aadhar

Peer-Reviewed & Refreed Indexed

Multidisciplinary International Research Journal

July -2021
ISSUE No- (CCXCIX) 299

आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीत यशवंतराव चव्हाण यांचे योगदान



Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Executive Editor
Dr. D. B. Tanduljekar
I/C Principal
Yeshwantrao Chavan College,
Ambejogai, Dist.- Beed

Editor
Dr. Anant Dadarao Markale
Head, Dept. of Hist.
Yeshwantrao Chavan College,
Ambejogai, Dist.- Beed

The Journal is indexed in:

Scientific Journal Impact Factor (SJIF)
Cosmos Impact Factor (CIF)
International Impact Factor Services (IIFS)

Aadhar International Publication Amaravati

Website – www.aadharsocial.com **Email** – aadharsocial@gmail.com.

INDEX

No.	Title of the Paper — Authors' Name	Page No.
1	यशवंतराव चव्हाणांचे शैक्षणिक कार्य — **डॉ उल्हास उढाण**	1
2	यशवंतराव चव्हाण यांच्या पुरोगामी नेतृत्वाची जडणघडण व शैक्षणिक योगदान — **श्री. रमेश चव्हाण**	4
3	यशवंतराव चव्हाण यांचे कायदेभंग चळवळीतील योगदान : ऐतिहासिक विश्लेषण — **डॉ प्रवीण जगन्नाथ अढाऊ**	10
4	यशवंतराव चव्हाण व्यक्ती आणि कार्य — **परसराम एकनाथ शेळके**	15
5	कर्तृत्ववान संरक्षणमंत्री यशवंतरावजी चव्हाण(१९१३—१९८४) — **प्रा.आर.बी. वाघ**	19
6	बहुआयामी व्यक्तिमत्त्व-यशवंतराव चव्हाण — **प्रा.डॉ.विजयेंद्र विश्वनाथ पाटील**	23
7	यशवंतराव चव्हाण यांचे आर्थिक विचार व कार्य — **डॉ. विठ्ठल शंकरराव फुलारी**	27
8	यशवंतराव चव्हाण यांचे शिक्षणविषयक कार्ये — **डॉ.डी.एस.पटवारी**	30
9	यशवंतराव चव्हाणांचे संरक्षण विषयक कार्य — **प्रा.डॉ.महादेव गणपत देशमुख**	35
10	यशवंतराव चव्हाण यांचे राजकारणातील नेतृत्व भूमिका व योगदान — **डॉ. शांताराम चव्हाण**	39
11	महाराष्ट्राचे शिल्पकार— यशवंतराव चव्हाण — **डॉ. श्री. निळकंठ रामचंद्र व्यापारी**	46
12	यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक क्षेत्रातील कार्य — **सहा.प्रा.दिपक हरी लहासे**	48
13	दूरदृष्टीचा नेता : यशवंतराव चव्हाण — **डॉ. विठ्ठल केदारी**	51
14	यशवंतराव चव्हाण यांचे शिक्षणविषयक विचार — **प्रा.डॉ.प्रशांत कोठे**	54
15	यशवंतराव चव्हाण यांचे सामाजिक कार्य — **प्रा.डॉ.अनंत दादाराव मरकाळे**	57
16	यशवंतराव चव्हाण व्यक्ती आणि कार्य — **डॉ.पी.आर. थारकर**	60
17	यशवंतराव चव्हाण यांचे सामाजिक क्षेत्रातील कार्य — **डॉ.गजानन आनंता देवकर**	63
18	अष्टपैलू यशवंतराव चव्हाण — **डॉ.शिवाजी धोंडिबा दहिकाबंळे**	67
19	यशवंतराव चव्हाण यांचे सामाजिक क्षेत्रातील कार्य. — **श्री.एम.के.भाबरदोडे**	72

20	यशवंतराव चव्हाण यांचे सामाजिक कार्ये **डॉ.आर.व्ही. मोरे**	74
21	यशवंतराव चव्हाण यांचे राजकीय क्षेत्रातील कार्य **प्रा.डॉ.बालाजी परबतराव खराबे**	78
22	यशवंतराव चव्हाण यांच्या आर्थिक विचारांचे महत्त्वपूर्ण योगदान **डॉ.ज्योती रामराव रामोड**	82
23	आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीत यशवंतराव चव्हाण यांचे योगदान **सौ.सुगंधा परेश जाधव**	85
24	**यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक व सहकार विषयक विचार** **डॉ.नवनाथ गोविंदराव अडकिणे**	89
25	संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील यशवंतराव चव्हाण यांची भूमिका **प्रा.डॉ.देवर्षी मुकुंद अरविंद**	92
26	यशवंतराव चव्हाण यांच्या अर्पणपत्रिकेतील वेणूताई विषयीची कृतज्ञता **प्रा.डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे**	99
27	यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान **प्रा.मनोज बबनराव देवकर**	102
28	राजकीय सामाजिकरणातून घडलेले नेतृत्व – यशवंतराव चव्हाण **प्रा.डॉ.सुपेकर वैशाली प्रशांत**	105
29	व्दैभाषिक राज्यातील यशवंतराव चव्हाण यांचे योगदान **प्रा.सांगळे भाऊसाहेब खंडु**	109
30	यशवंतराव चव्हाणांचे ग्रामिण सामाजिक विकासामधील योगदान **प्रा.बी.एच.चौगुले**	112
31	यशवंतराव चव्हाण यांचे पंचायत राज व सहकार क्षेत्रातील कार्य **सचिन सहादू घायतडके**	117
32	'यशवंतराव चव्हाण यांचे साहित्यिक क्षेत्रातील कार्य' **प्रा.डॉ. मोरे संगीता दत्ताजी**	120
33	महाराष्ट्राचे भाग्यविधाता मा. यशवंतराव चव्हाण **डॉ संजय गोपाळराव ठवळे**	124
34	यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक विचार व कार्य एक अभ्यास **डॉ.जयदीप रा.सोळुंके**	128
35	यशवंतराव चव्हाण यांच्या कार्य कर्तृत्वावर भारतीय स्वातंत्र्य लढयाचा प्रभाव **प्रा. डी. एन. रिठे**	133
36	यशवंतराव चव्हाण यांची रसिकता व साहित्य चिंतन **प्रा. दिलीप ज्ञानोबाराव भिसे**	136
37	आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीत यशवंतराव चव्हाण यांचे योगदान **डॉ.शिवाजी सोमला पवार**	143
38	यशवंतराव चव्हाणांचे शैक्षणिक व आर्थिक विचार **डॉ. प्रतिमा बाळासाहेब कदम**	149
39	आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीत यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक व सामाजिक योगदान **डॉ. संजय सागरु सपकाळ**	153

40	यशवंतराव चव्हाण : शैक्षणिक आणि सामाजिक योगदान **प्रा. डॉ. संजय सुरेवाड**	**157**
41	यशवंतराव चव्हाण यांचे शिक्षणविषयक कार्य **प्रा.डॉ. अमोल गंगणे**	**160**
42	आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीत यशवंतराव चव्हाण यांचे योगदान **रमेश गोवर्धन जाधव**	**163**
43	समृध्द महाराष्ट्राच्या शैक्षणिक जडणघडणीत यशवंतराव चव्हाण यांच्या योगदानाचा अभ्यास **वैशाली रामकृष्ण सारणीकर /प्राचार्य डॉ. विजय गोरोबा सरपे**	**165**
44	यशवंतराव चव्हाण: एक थोर साहित्यिक **श्री काचगुंडे हनुमंत महादेव /प्रा. डॉ. दिलीप भिसे**	**168**
45	आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीत यशवंतराव चव्हाण यांचे योगदान **परमेश्वर ज्ञानोबा रूपनर**	**171**
46	अष्टपैलू यशवंतराव चव्हाण **श्रीकांत दीनकरराव तांदळे**	**174**
47	Krushnakath: The Inspiring Autobiography of Sensitive Politician Yeshwantrao Chavan. **Dr. M. S. Rajpankhe**	**178**

यशवंतराव चव्हाण यांचे पंचायत राज व सहकार क्षेत्रातील कार्य

सचिन सहादू घायतडके
बी.डी.काळे महाविद्यालय, घोडेगाव
संपर्क— sachin.ghaytadke55@gmail.com,**९९६०४५८८४५/८९९९५०७०३१**

घोषवारा-

आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडनीत यशवंतराव चव्हाण यांचा मोलाचा वाटा आहे. आधुनिक महाराष्ट्राची पायाभरणी यशवंतराव चव्हाण यांनी केली. महाराष्ट्राच्या निर्मितीपूर्वी १९५६ मध्ये स्थापन झालेल्या द्विभाषिक मुंबई राज्याचे पहिले मुख्यमंत्री म्हणून त्यांची निवड झाली होती. मुंबईसह स्वतंत्र महाराष्ट्र निर्माण झाल्यानंतर महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणूनही त्यांचीच निवड झाली. पण, १९६२ मध्ये चीन युद्धाच्या काळात तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरूंनी यशवंतरावांची नेमणूक देशाच्या संरक्षणमंत्रीपदावर केली. हा त्यांच्या कारकिर्दीचा सर्वोच्च बिंदू म्हणता येईल. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितिनंतर सत्तेचे विकेंद्रीकरण घडवून आणण्यात स्व.यशवंतराव चव्हाण यांचा मोलाचा वाटा होता. मुख्यमंत्री पदावर असताना महाराष्ट्रातील पंचायत राज व्यवस्था निर्माण करण्याच्या हेतूने वसंतराव नाईक समितीची स्थापना केली आणि महाराष्ट्रात त्रिस्तरीय पंचायत राज व्यवस्थेची निर्मिती केली. सुरुवातीला महाराष्ट्रात आमदार आणि खासदार या दोन माध्यमातूनच राजकीय कार्यकर्त्यांना राजकारणात जाण्यासाठी संधी मिळत असे परंतु सत्तेच्या विकेंद्रीकरनामुळे सामान्य जनतेला राजकारणात सहभागी होण्यासाठी मोठ्या प्रमाणात संधी प्राप्त झाल्या. आज त्याच पायावर सामान्यांना विविध सभागृहांची दारे खुली झाली आहेत. लोकप्रतिनिधित्वाची संधी मिळत आहे.

सहकार क्षेत्रातही यशवंतराव चव्हाण यांचे कार्य मोलाचे आहे. स्व. वैकुंठभाई मेहता यांचा सैद्धांतिक सहकार आणि धनंजयराव गाडगीळ यांचा वैचारिक सहकाराला यशवंतराव चव्हाण यांनी वैधानिक स्वरूप प्राप्त करून दिले. ग्रामीण भागातील सर्व सेवा सहकारी संस्था, दूध उत्पादक संस्था, तालुका स्तरावरील खरेदी-विक्री संघ, बाजार समिति, जिल्हा स्तरावर जिल्हा मध्यवर्ती बँक, राज्य स्तरावर राज्य सहकारी बँक आणि भू-विकास बँक, शेतीमालावर प्रक्रिया करणारया सहकारी संस्था, सहकारी साखर कारखाने तशेच सहकारी सूत गिरण्या यांचे जाळे निर्माण करुन महाराष्ट्राला समृद्ध केले. सहकरातून राजकीय कार्यकर्त्यांची एक भक्कम फळीउभी रहावी अशी त्यांची अपेक्षा होती.

आधुनिक महाराष्ट्रामध्ये लोकशाही विकेंद्रिकरणाची प्रक्रिया, सहकार क्षेत्राची वाढ या गोष्टींची पयाभरणी यशवंतराव चव्हाण यांनी केली.

Keywords- यशवंतराव चव्हाण, सहकार, पंचायत राज व्यवस्था, लोकशाही विकेंद्रीकरण.

प्रस्तावना-

संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री आणि आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी दाखवलेली दूरदृष्टि आणि घेतलेले अचूक निर्णय याच पायावर आजचा आधुनिक महाराष्ट्र उभा आहे. यशवंतराव चव्हाण हे प्रागतिक विचारसरणीचे होते. उत्कृष्ट संसदपटू, उदारमतवादी व अभ्यासू व्यक्तिमत्त्व म्हणूनच त्यांची ख्याती आहे. ते रसिक व साहित्यिकही होते. राजकारणात पडले नसते तर कदाचित यशवंतराव चव्हाण हे महान साहित्यिक झाले असते. त्यांची भाषणे, लिखाण वाचून त्यातील सहजसुंदर भाषाशैलीवरून ते अगदी साहित्यक्षेत्रात गेले असते, तर ज्ञानपीठापर्यंत पोहोचले असते इतकी त्यांची प्रतिभा होती. पुस्तकांवर त्यांनी प्रचंड प्रेम केले. त्यांच्या खजिन्यातील पुस्तके ही आजही कराडच्या वाचनालयात आणि संग्रहालयात पाहायला मिळतात. युगांतर, सह्याद्रीचे वारे, कृष्णाकाठ, ऋणानुबंध ही त्यांची साहित्यसंपदा अत्यंत अनमोल अशी आहे.यशवंतराव चव्हाण यांच्या ४० वर्षांच्या राजकीय कारकिर्दीत त्यांनी घेतलेला प्रत्येक निर्णय राज्याच्या हिताचा आणि सर्वसामान्य जनतेच्या भल्याचा होता. राज्याच्या सहकार आणि राजकीय क्षेत्रातच नाही तर कृषी, शैक्षणिक, आर्थिक, औद्योगिक, सांस्कृतिक क्षेत्रातही त्यांच मोठ योगदान आहे. राज्यात पायाभूत प्रकल्प आणि भौतिक सुविधांची निर्मिती करीत असताना इथल्या समाजकारण आणि राजकारणाला सुयोग्य दिशा देण्याचे

काम यशवंतराव चव्हाण यांनी केले.संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितिनंतर प्रादेशिक असमतोल दूर करण्याच्या दृष्टीने मुंबई, कोकण, खानदेश, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ असे विभाग करून भौगोलिक आणि सांस्कृतिक विविधता असलेल्या राज्याला एका सूत्रात बांधण्याचे काम यशवंतराव चव्हाण यांनी केले. त्यादृष्टीकोनातून यशवंतराव चव्हाण यांच्या सामजिक व राजकीय कार्याचा आढावा घेणे आवश्यक आहे.

समाजाच्या शेवटच्या स्तरापर्यंत अपेक्षित लाभ पोहचणे गरजेचे आहे हे ओळखुन यशवंतराव चव्हाण यांनी त्यादृष्टीने प्रयत्न केले. समाजाच्या शेवटच्या स्तरापर्यंत पोहचायचे असेल तर सत्तेचे विकेंद्रीकरण होणे आवश्यक आहे तरच सर्व योजना सामान्य जनतेपर्यंत पोहचु शकतील हे ओळखुन त्यांनी महाराष्ट्रात पंचायत राज व्यवस्थेची निर्मिती केली आणि त्याच आधारे या शोधनिबंधातुन यशवंतराव चव्हाण यांचे पंचायत राज व्यवस्थेतील कार्य अभ्यासले आहे.

१९६० साली महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर यशवंतराव चव्हाण यांनी सार्व. क्षेत्रातील सर्व प्रकारच्या संस्था वाढवण्यासाठी तशेच जोपासण्यासाठी उदार दृष्टिकोन ठेवण्याचे काम त्यांनी केले. ग्रामीण भागातील कृषी क्षेत्रात नवचैतन्य आणायचे असेल तर सहकाराशिवाय पर्याय नाही हे ओळखुन त्यांनी महाराष्ट्रात सहकाराचे जाळे निर्माण केले. सहकाराच्या माध्यमातून त्यांच्या काळात महाराष्ट्र समृद्ध तर बनलाच परंतु ग्रामीण जनतेच्या हातात पैसा खेळू लागला. ग्रामीण भागात सहकाराच्या माध्यमातून विविध शेती प्रक्रिया उद्योग उभे राहिले. सहकारी साखर कारखाने, सहकारी दूध उत्पादक संस्था स्थापन करुन ग्रामीण जनतेच्या मालाला उत्पादनाची हमी त्याद्वारे मिळवून दिली. त्याचप्रमाणे राजकीय क्षेत्रात सहकाराच्या माध्यमातून कार्यकर्त्यांची एक चांगली फळी उभी रहावी यासाठी यशवंतराव चव्हाण यांनी प्रयत्न केले. या शोधनिबंधातून यशवंतराव चव्हाण यांच्या सहकार क्षेत्रातील कार्याचा आढावा घेतला आहे.

यशवंतराव चव्हाण यांचे पंचायत राज व्यवस्थेतील कार्य-

पंचायत राज या त्रिस्तरीय (जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत) व्यवस्थेची सुरुवात ही यशवंतराव चव्हाणांची संपूर्ण देशाला असलेली फार मोठी देणगी आहे. संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाल्यानंतर महाराष्ट्रात पंचायत राज व्यवस्था निर्माण करण्यासाठी त्यांनी वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली. या समितीने अभ्यास करून आपला अहवाल सरकारला सादर केला. महाराष्ट्र सरकारने समितीच्या शिफारशी स्विकारुन मुंबई जिल्हा परिषद पंचायत समिती कायदा सन १९६१ रोजी मंजूर केला. १ मे १९६२ रोजी या कायद्यानुसार महाराष्ट्रात जिल्हा स्तरावर जिल्हा परिषद आणि तालुका स्तरावर पंचायत समिती स्थापन करण्यात आली. ग्रामपंचायतीसाठी याअगोदरच मुंबई ग्रामपंचायत अधिनियम लागू करण्यात आला होता. अशा प्रकारे महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली त्रिस्तरीय पंचायत राज व्यवस्था अस्तित्वात आली. ग्रामीण भागातील नव नेतृत्वाला राजकीय संधी या माध्यमातून निर्माण झाल्या. महाराष्ट्रात सत्तेचे विकेंद्रीकरण घडवून आणण्यात यशवंतराव चव्हाण यांचा मोठा वाटा होता.सत्तेच्या केंद्रीकरणाला आळा घालून विकेंद्रीकरणाची योजना पंचायत राज व्यवस्थेतुन यशवंतरावांनी निर्माण केली. आज त्याच पायावर सामान्यांना विविध सभागृहांची दारे खुली झाली आहेत. लोकप्रतिनिधित्वाची संधी आज समाजातील सर्व घटकांना मिळत आहे. पंचायत राज व्यवस्थेच्या माध्यमातून यशवंतराव चव्हाण यांनी प्रशासकीय विकास करण्याचे धोरण अवलंबले होते.समाजातील शेवटच्या घटकाचा विकास करायचा असेल तर शेवटच्या घताकपर्यंत पोहचायला हवे आणि त्यासाठी पंचायत राज व्यवस्था महत्वाची भूमिका पार पाडेल हा विश्वास यशवंतराव चव्हाण यांना होता.

यशवंतराव चव्हाण यांचे सहकार क्षेत्रातील कार्य-

देशाच्या सहकार क्षेत्रात महाराष्ट्राचे योगदान हे सर्वाधिक आहे. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपासून आणि पूर्वीपासून महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास व्हावा असे ज्यांना मनोमन वाटत होते त्यापैकी कृतीशील आणि अग्रणी नाव म्हणजे यशवंतराव चव्हाण होय. त्यांनी सहकाराला योग्य दिशा आणि मूर्त स्वरूप तशेच भक्कम पाया घालून दिला. महाराष्ट्रातील सहकार चळवळीचा पाया जरी स्वातंत्र्यपूर्व काळात घातला गेला असला तरी १९६० नंतर यशवंतराव चव्हाण यांच्या काळात सहकारी चळवळीला सरकारी अर्थसहाय्य मोठ्या प्रमाणात मिळाले त्यामुळे सरकारचे मिळालेले हे पाठबळ महाराष्ट्रातील सहकार चळवळीच्या वाढीला, प्रगतीला पूरक ठरले. कृषी आणि औद्योगिक क्षेत्रात राज्यभर सहकार क्षेत्राचे जाळे विणून सामजिक व आर्थिक क्षेत्रातील विषमता दूर करता येईल अशी यशवंतराव चव्हाण यांची धारणा होती.

महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली सरकारने जुना सहकार कायदा बदलून त्याजागी बदलत्या धोरनानुसार कायद्यामध्ये नविन सुधारणा करण्याचे योजले. त्यानुसार महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा, १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्थांचे नियम, १९६१ हे अस्तित्वात आले.यशवंतराव चव्हाण यांनी सहकार चळवळीच्या माध्यमातून राजकीय क्षेत्रामध्ये महत्वकांक्षा बाळगनार्या कार्यकर्त्यांना सहकार

क्षेत्र उपलब्ध करुन दिले. शासनाकडून मोठ्या प्रमाणात कर्जपुरवठा तशेच सहकारी संस्थांच्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ मिळवून देण्याचे काम यशवंतराव चव्हाण यांनी मुख्यमंत्री पदावर असताना केले.महाराष्ट्राच्या ऊस पीक क्षेत्रात प्रामुख्याने स्वातंत्र्यपूर्व काळात खाजगी साखर कारखाने कार्यरत होते. राज्यात त्या काळी १२ खाजगी कारखाने होते. १९४८ साली धनंजयराव गाडगीळ आणि पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांनी प्रवरानगर येथे पहिला सहकारी साखर कारखाना उभा केला. त्यानंतर यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील सरकारने घेतलेल्या शेतीपूरक उदार धोरनांमुळे राज्यात शेतकरी सभासदांच्या मालकीचे एकुण १८ सहकारी साखर कारखाने उभे राहिले.साखर कारखाने म्हणजे विकासाचे आणि समृद्धीचे प्रतीक आहेत. कारण, एका सहकारी साखर कारखान्याच्या जोरावर औद्योगिक वसाहत निर्माण करण्याची फार मोठी ताकद निर्माण झाली होती. फार मोठी आर्थिक गणिते तिथे होती. साखर कारखान्यामुळे सहकारी बँका, सहकारी कुकुटपालन केंद्रे, बझार यातून शेतीचे मार्केटिंग आणि रोजगाराची निर्मिती झाली होती.

त्याचप्रमाणे यशवंतरावांनी कृषी आधारित सहकारी प्रक्रिया उद्योगांना चालना देण्यासाठी धोरणे आखली. राज्यातील सामजिक, आर्थिक, सांस्कृतिक क्षेत्राच्या विकासाबरोबर सहकारी चळवळीच्या विकासाला गती देण्याचे काम त्यांनी केले. साखर उद्योगाबरोबर राज्याच्या ग्रामीण भागात शेती मालावर प्रक्रिया करणार्या इतर सहकारी संस्था, सहकारी खरेदी-विक्री संघ, बाजार समिती, सूत गिरण्या, सहकारी कुक्कुटपालन संस्था, सहकारी दूध संस्था इतर उद्योग त्यांच्या काळात महाराष्ट्रात उभे राहिले. यशवंतराव चव्हाण यांच्या कल्पक नेतृत्वाखाली सहकारी पतपेढया, नागरी बँका यांचे प्रस्थ वाढले व त्यातून ग्रामीण भागाच्या विकासाला चालना मिळाली.

सहकार क्षेत्रातून जरी नव नेतृत्व उभे रहात असले तरी सहकार क्षेत्रातील व्यक्तींनी ते जोपर्यंत सहकार क्षेत्रात आहेत तोपर्यंत त्यांनी राजकारणात येवू नये. सहकार क्षेत्राचा राजकरानासथी उपयोग केला जाऊ नये, यासाठी ते जाणीवपूर्वक प्रयत्न करत होते. सहकाराचे पावित्र्य जपले तरच सहकारी संस्था भक्कम राहतील आणि पर्यायाने ग्रामीण भागाची आर्थिक स्थिती मजबूत राहील, हा विचार त्यांनी त्या काळात जनमानसात रुजवला. सहकाराच्या माध्यमातून उत्पन्नाची विभागणी समप्रमानत होइल व सहकारातून होणारा नफा सामान्य जनतेपर्यंत पोहचविला जाईल व त्यातून आर्थिक दुर्बल घटकांना सक्षम होण्यासाठी त्याची मदत होईल अशी भूमिका यशवंतराव चव्हाण यांची होती.

केंद्रात गेल्यानंतर सुद्धा यशवंतराव चव्हानांनी स्व. वसंतदादा पाटील, आबासाहेब खेबुडकर यांसारख्या नेत्यांच्या सहकार कार्याला पाठबळ मिळवून दिले. महाराष्ट्रातील ग्रामीण भागाला त्यांनी सहकाराच्या माध्यमातून आर्थिक स्थैर्य प्राप्त करून दिले. ग्रामीण जनतेचा आर्थिक भांडवलाचा प्रश्न सहकारातून मार्गी लावण्याचे काम त्यांनी केले. आजचे महाराष्ट्रातील सहकार क्षेत्र यशवंतरावांनी घातलेल्या पायावर उभे आहे. सहकार क्षेत्राला सध्या कठीण दिवस आलेले आपल्याला दिसतात परंतु आजच्या राज्यकार्त्यानी जार यशवंतरावांनी घालून दिलेली मुल्ये, नितीतत्वे पाळली असली तर आज हे दिवस आले नसते.

समारोप-

आधुनिक महाराष्ट्रामध्ये लोकशाही विकेंद्रीकरणाची प्रक्रिया, सहकार क्षेत्राची वाढ यशवंतराव चव्हानांनी घडवून आणली.त्यामागे ग्रामीण जीवनामध्ये सामजिक परिवर्तन घडवून आणणे हाच हेतू त्यांचा होता. सत्तेचे विकेंद्रीकरण करून पक्ष स्थानिक पातळीवर पोहचवणे हा राजकीय हेतू जरी त्यामागे असला तरी त्या व्यवस्थेतून ज्या घटकांना कधीही प्रतिनिधित्व मिळाले नव्हते अशा दुर्लक्षित घटकांना राजकीय प्रतिनिधित्व पंचायत राज व्यवस्थेतून मिळू लागले.

यशवंतराव चव्हानांनी सहकाराचे जाळे निर्माण करुन महाराष्ट्राला समृद्ध केले. सहकारातून राजकीय कार्यकर्त्यांची एक भक्कम फळी उभी रहावी अशी त्यांची अपेक्षा होती आणि या सहकार क्षेत्रामुळे देखील कायापालट झालेला आपल्याला पहायला मिळतो.

संदर्भ-

१) भोळे भा.ल.(२००७) यशवंतराव चव्हाण: राजकारण आणि साहित्य: साकेत प्रकाशन

२) कुलकर्णी भालचंद्र (२०१२) सहकार सुगंध, यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी विशेषांक: एकवीरा प्रकाशन

३) रायरिकर बाळकृष्ण, सुरनिस श्रीनिवास (२००७) आमचे मुख्यमंत्री

४) चव्हाण अनिल (२०१२) लोकनेते यशवंतराव चव्हाण: भरारी एज्युकेशनल एंड सोशल फ़ौंडेशन

५) डॉ. पाटिल संतोष संभाजी (एप्रिल-जून २०१९)सहकार चळवळीचाविश्लेषनात्मक अभ्यास:पुणे रिसर्च टाइम्स